पोलीस अधीक्षक, कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp. palghar@mahapolice.gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेसनोट क्र. ०५ दिनांक १०/०१/२०२३

# अपहरीत मुलाचा २४ तासाचे आत शोध घेण्यास तलासरी पोलीसांना यश

दिनांक ०९/०१/२०२३ रोजी सकाळी ०८.३० वाजेच्या सुमारास, फिर्यादी यांचा अपहरीत मुलगा वय वर्षे ०८, रा. अनवीर रायातपाडा, ता. तलासरी, जि. पालघर हा जि. प. शाळा अनवीर रायातपाडा शाळेचे मैदानात खेळत असताना आरोपीत याने त्यास त्याच्या मावशीने बोलाविले आहे असे खोटे बोलुन आमीष दाखवून त्यास बळजबरीने ईको कारमध्ये बसवून फिर्यादी यांचे संमतीशिवाय फुस लावुन पळवुन नेले म्हणुन फिर्यादी यांनी दिले फिर्यादीवरुन तलासरी पोलीस ठाणे येथे गु.र.नं. I ०४/२०२३ भा.द.वि.सं.क. ३६३ प्रमाणे तात्काळ गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून श्री बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर, श्री पंकज शिरसाठ, अपर पोलीस अधीक्षक पालघर यांनी श्री. संजीव पिंपळे, उपविभागीय पोलीस अधिकारी डहाणु विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पोनि/अजय वसावे, प्रभारी अधिकारी तलासरी पोलीस ठाणे यांना तपास पथक तयार करुन तपासाबाबत सुचना दिल्या. त्यानुसार प्राथमिक माहितीच्या आधारे असे निदर्शनास आले की, फिर्यादी यांचे बहिणीसोबत आरोपी यांचे प्रेमसंबंध होते व फिर्यादी यांचा सदर लग्नासाठी नकार होता. याचा मनात राग धरुन आरोपी याने फिर्यादी यांच्या मुलाचे अपहरण केले होते.

सदर अपहरीत मुलाचा शोध घेत असताना मिळालेल्या माहितीच्या आधारे व तांत्रीक पुराव्याच्या आधारे कोणतेही धागेदोरे नसताना कौशल्यपुर्ण तपास करुन २४ तासाच्या आत अपहरण करणारा मुख्य आरोपी वय वर्षे ३५ रा. सिल्वासा मुळ रा. कवाडा ता. तलासरी जि. पालघर यास ताब्यात घेवून नमुद गुन्ह्याची उकल करण्यात आली आहे. सदर अपहरीत मुलास फिर्यादी यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. नमुद गुन्ह्याचा अधिक तपास पोउपनि/उमेश रोठे, नेमणूक तलासरी पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर व श्री पंकज शिरसाठ, अपर पोलीस अधीक्षक पालघर यांचे आदेशान्वये श्री. संजीव पिंपळे, उपविभागीय पोलीस अधिकारी डहाणु विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली पोनि/अजय वसावे, प्रभारी अधिकारी तलासरी पोलीस ठाणे, पोउपनि/उमेश रोठे, पोउपनि/भाऊ गायकवाड, पोउपनि/गावित, सफौ/उमतोल, पोहवा/१९७ चंद्रकांत सुरुम, पोहवा/६ जि. एम. धोडी, मपोना/३७४ एस. एस. महाली सर्व नेमणुक तलासरी पोलीस ठाणे ठाणे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.